## निवडक



शिवोली : विद्यार्थ्यांच्या गुणगौरव प्रसंगी उपस्थित शर्मिला वेरणेकर व इतर.

### शिवोलीत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १५ :** राय शिवोली येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. माजी सरपंच व विद्यमान पंच सदस्य शर्मिला वेर्णेकर यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वेरणेकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. आज–काल विद्यार्थ्यांना अनेक सोयी उपलब्ध असतात. या सोयीचा लाभ घेऊन सर्वांनी चांगले शिकावे. आपल्या गावाचे, राज्याचे व देशाचे नाव उज्वल करावे असे आवाहन वेर्णेकर यांनी केले. गेल्या काही वर्षापासून विद्यार्थ्यांचा गौरव केला जातो. त्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे हा त्याचा हेतू असतो. यापुढेही विद्यार्थ्यांना तसेच सहकार्य दिले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

---

### हरमल रवळनाथ वर्धापनदिनानिमित्त आज 'अलख निरंजन' नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १५ :** येथील ग्राम दैवत श्री देव रवळनाथ पंचायतन देवस्थानच्या २६ व्या वर्धापनदिन सोहळ्यात रविवार दि. १६ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम साजरे होणार आहे,असे देवस्थान समितीचे अध्यक्ष नारायण शेणवी केरकर यांनी कळविले आहे. यादिनी सकाळी ८ वाजता धार्मिक विधिना सुरुवात गणपती पूजन, पुण्याहवाचन मातृका पूजन, नांदी श्राद्ध, संभारदन, आचार्य वरण, ऋत्विकवरण, प्राकारशुध्दी, श्री देव रवळनाथ कडे लघुरुद्र,महापूजा, श्री गणेशायनम जप, ग्रह स्थापना, ग्रह होम, श्री रवळनाथ परिवार अभिषेक पूजा, आरती, तीर्थप्रसाद, संध्याकाळी ४ ते ६.३० पर्यंत श्री. गंगाराम उर्फ नाना धर्माजी पार्सेकर (वरचावाडा) व साथी यांचा भजनाचा कार्यक्रम होईल. या सोहळ्यात हरमल गावात शालांत,बारावी तसेच पदव्युत्तर परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा होणार आहे. त्यानंतर संध्याकाळी ७ वाजता नाटक 'अलख निरंजन' नाटक होणार आहे. सदर दोन्ही कार्यक्रम, हरमल गावातील पोलीस बांधवातर्फे होईल.तरी भाविक तसेच पालकांनी मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन श्री देवस्थान समितीने केले आहे.

---

### केरीत १६ रोजी दिंडी महोत्सवाचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**केरी, दि. १५ :** अमेजिंग आजोबा स्पोर्ट्स अँड कल्चरलं क्लब केरीतर्फे रविवार दि. १६ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता श्री सातेरी केळबाई आजोबा देवस्थान केरी सत्तरी येथे अखिल गोवा फक्त आमंत्रित गटांसाठी दिंडी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. दिंडी महोत्सवानंतर संध्या.
या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आरोग्य मंत्री श्री. विश्वजित प्रतापसिंह राणे,सन्माननीय अतिथी पर्ये मतदार संघाची आमदार सौ. देविया विश्वजित राणे,विशेष अतिथी ज़िल्हा पंचायत सदस्य सौ. देवयानी गावस, सरपंच सौ. सुप्रिया गावस, उपसरपंच श्री. उस्मान सय्यद, पंच श्री. भिवा गावस व इतर पंचायत सदस्य उपस्थित राहणार आहेत. या दिंडी मोहत्सवाला प्रथम पारितोषिक ४०००० तर द्रितीय ३००००, तृतीय २००००, चौथे १०००० व चषक, पाचवे १०००० व चषक, सहावे १०००० व चषक. तसेच चार प्रोत्साहन पारितोषिके प्रत्येकी ५००० व चषक, वैयक्तिक बक्षिसे पण प्राधान्य करण्यात येईल. उत्कृष्ट गायन संघ, उत्कृष्ट पखवाज संघ, उत्कृष्ट वेशभूषा, उत्कृष्ट तुकाराम, उत्कृष्ट वासुदेव, उत्कृष्ट विठ्ठल रखुमाई. तेव्हा सर्वांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन समितीने केले आहे.

---

मेणकुरे येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १५ :** सावित्रीबाई फुले यांची १९४ जयंती मधलावाडा मेणकुरे येथे साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सतीश कोरगावकर तर प्रमुख वक्ता म्हणून वासंती परवार उपस्थित होत्या.
यावेळी मल्लिका माटे तसेच खास पाहूणे कृष्णा गावकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक परवार यांचे याप्रसंगी भाषण झाले त्यांनी आपण संघटित राहिल्यास कोणतेही काम चांगले करू शकतो असे सांगितले. यावेळी मंचावर संजना पवार, सावनी परवार, गुरुदास मिसाळ उपस्थित होते सूत्रसंचालन राधिका परवार यांनी केले. तर आत्माराम पवार यांनी आभार मानले.

---

### केरी ग्रामपंचायतीची आज ग्रामसभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १५ :** केरी ग्रामपंचायतीची ग्रामसभा येत्या रविवार दि. १६ रोजी सकाळी १० वाजता केरी ग्रामपंचायतीच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. तरी या सभेस ग्रामस्थांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच तृप्ती नाईक यांनी केले आहे.

# भारत सौर महासत्ता; संयुक्त राष्ट्र हवामान प्रमुखांचे गौरवोद्गार

**नवी दिल्ली, दि. १५ :**



संयुक्त राष्ट्रांचे हवामान प्रमुख सायमन स्टील यांनी भारताला सौर महासत्ता म्हणून गौरवले असून, संपूर्ण अर्थव्यवस्थेला व्यापून टाकणारी महत्त्वाकांक्षी हवामान योजना विकसित करण्याचे आवाहन केले आहे. भारताने जागतिक स्वच्छ ऊर्जा परिवर्तनाला अधिक दृढपणे स्वीकारल्यास आर्थिक वाढीस चालना मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ईटी ग्लोबल बिझनेस समिटमध्ये सहभागी होण्यासाठी भारतात आलेल्या स्टील यांनी भारताच्या हवामान बदल कमी करण्याच्या प्रयत्नांचे कौतुक केले. ज्या वेळी काही देश केवळ घोषणा करतात, तेव्हा भारत प्रत्यक्ष कृती करतो, असे ते म्हणाले. स्टील यांनी सांगितले की, भारत हा १०० गिगावॅटपेक्षा जास्त सौर ऊर्जा उत्पादन करणाऱ्या मोजक्या चार देशांपैकी एक आहे. २०१८ पर्यंत देशभरातील सर्व गावांचे पूर्ण विद्युतीकरण झाल्यामुळे भारताने उर्जेच्या उपलब्धतेत मोठी झेप घेतली आहे. आता पुढचे पाऊल उचलण्याची आणि १.४ अब्ज लोकसंख्येसाठी आणखी मोठे फायदे मिळवण्याची संधी भारताकडे आहे, असे त्यांनी नमूद केले.

भारताच्या स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील वाटचालीचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, अक्षय ऊर्जा उत्पादनाची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढवण्याची भारताची योजना महत्त्वपूर्ण आहे. भारत हरित औद्योगिकीकरण, महत्त्वाचे तंत्रज्ञान विकसित करणे आणि निर्यात वाढवण्याच्या दिशेने अग्रस्थानी राहू शकतो, असे स्टील म्हणाले. या वर्षी सर्व देशांनी २०३१–२०३५ या कालावधीसाठी राष्ट्रीयरित्या निर्धारित योगदान किंवा हवामान कृती योजना सादर करणे आवश्यक आहे. मात्र, भारतासह अनेक देश १० फेब्रुवारीची अंतिम मुदत गमावत आहेत. त्यामुळे स्टील यांनी सप्टेंबरपर्यंत नवीन योजना सादर करण्याचे आवाहन केले.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, भारताच्या नवीन एनडीसी योजना उपलब्ध संसाधनांच्या मर्यादेनुसारच ठरवण्यात येतील. हवामान कृतीसाठी आर्थिक आणि तांत्रिक पाठबळाची आवश्यकता आहे. मात्र विकसित देश हे समर्थन देण्यास तयार नाहीत. त्यामुळे विकसनशील देशांनी का फटका सोसावा? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

२०१५ च्या पॅरिस कराराचे प्रमुख उद्दिष्ट औद्योगिक क्रांतीपासून जागतिक तापमान वाढ १.५ अंश सेल्सियसपर्यंत मर्यादित ठेवणे आहे. मात्र, विकसित देशांनी विकसनशील राष्ट्रांसाठी हवामान कृतीसाठी आर्थिक मदत देण्याचे आश्वासन पूर्ण केलेले नाही. गेल्या वर्षी अझरबैजानमध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदेत, २०३५ पर्यंत विकसनशील देशांना ३०० अब्ज डॉलर इतके आर्थिक साहाय्य देण्याचे जाहीर करण्यात आले. मात्र, भारताने ही रक्कम अत्यंत अपुरी आणि दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले होते, कारण हवामान कृतीसाठी दरवर्षी किमान १.३ ट्रिलियन डॉलर लागणार आहेत.

सायमन स्टील यांनी इशारा दिला की, योग्य हवामान कृती न केल्यास भारताच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. स्विसरेच्या अहवालानुसार, २०५० पर्यंत भारताच्या जीडीपी मध्ये ३५% घट होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अहवालाचा संदर्भ देत ते म्हणाले की,हवामान बदल आधीच आर्थिक व्यवस्थेवर परिणाम करत आहे. त्यामुळे भारताने लवचिकता उपायांसाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

भारताला हवामान कृतीत अधिक सक्रिय होण्यासाठी आवाहन करताना स्टील म्हणाले, भारतातील प्रत्येकाने अडथळे आणि नोकरशाहीतील अडथळे दूर करून देशाला खऱ्या अर्थाने सौर महासत्ता बनवण्यासाठी योगदान द्यावे. इलेक्ट्रिक इंडिया कधीही मागे वळून पाहणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## वाहतूक कोंडीमुळे विद्यार्थ्यांचे हाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १५ :** बारावी बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना वाहतूक पोलिसांनी वेळेआधी निघण्याचा सल्ला दिला आहे. तसेच, दुचाकी वगळता शक्यतो अटल सेतूचा वापर करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. शनिवारी, जुना मांडवी पुलाच्या पुनर्निर्माणाच्या कामामुळे नवीन मांडवी पुलावर तीव्र वाहतूक कोंडी निर्माण झाली. या कोंडीमुळे अनेक चारचाकी आणि दुचाकी अडकल्या, परिणामी काही विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षांना उशीर झाला.

वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, जुना मांडवी पूल बंद असल्याने बारावीच्या परीक्षांना जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी लवकर निघावे. तसेच, फोंडा – बांबोळी – दक्षिण गोवा आणि उलट दिशेने जाणाऱ्या दुचाकी वगळता अन्य वाहनधारकांनी नवीन मांडवी पुलावरील गर्दी टाळण्यासाठी अटल सेतूचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) ८ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत जुना मांडवी पूल सर्व प्रकारच्या वाहनांसाठी तात्पुरता बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या कालावधीत पुलाचे डांबरीकरण, सुरक्षा उपाय आणि रंगकाम यासारखी दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत. या काळात, वाहनांची वाहतूक नवीन मांडवी पुलावरून वळवली जाईल. सर्वसामान्य जनतेने याची नोंद घ्यावी आणि विलंब टाळण्यासाठी त्यानुसार त्यांच्या प्रवासाचे नियोजन करावे,असे वाहतूक विभागाकडुन स्पष्ट करण्यात आले आहे. एनएच(ओ) वार्षिक योजना २०२३–२४ अंतर्गत राज्यातील राष्ट्रीय महामार्ग–६६ वरील नवीन आणि जुन्या मांडवी पुलांसाठी कार्पेट ओव्हरले करणे, सुरक्षा उपाय आणि रंगरंगोटी' करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

कंत्राटी एजन्सीला डायव्हर्जन मार्गांचे उल्लेख करणारे साइनबोर्ड ठळकपणे लावण्याचे आणि इंडियन रोड्स काँग्रेस आणि रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांनी घालून दिलेल्या सर्व रस्ते सुरक्षा उपायांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान स्थानिक कार्यकर्ते राजेश दाभोलकर यांनी परीक्षेच्या काळात हे काम सुरू केल्याबद्दल पीडब्ल्यूडीवर टीका केली आहे. गेल्या वर्षीही परीक्षांच्या वेळी पुल बंद करण्यात आला होता. तीच चूक यंदाही करण्यात आली आहे, असा आरोप त्यांनी केला.

## बाणावली मतदारसंघात सततची पाणी टंचाई असल्याचा काँग्रेसचा आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. १५ :** बाणावली काँग्रेस ब्लॉकने मतदारसंघातील अनेक गावांना भेडसावणाऱ्या गंभीर पाणीटंचाईवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. एक दशकापूर्वी बांधलेल्या ओव्हरहेड वॉटर टँकच्या अकार्यक्षम स्थितीवर नाराजी व्यक्त करीत कॉन्ग्रेसने रहिवाशांना भेडसावणाऱ्या सततच्या पाणी टंचाईकडे लक्ष वेधले.

याबाबत ब्लॉक अध्यक्ष कीथ ग्रासियास आणि इतर नेत्यांनी सांगितले की, कोलवा वॉर्ड नं. २, फात्राडे, वार्का आणि ओरलीच्या काही भागांमधील रहिवाशांना सतत पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे या भागात अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. २०१६ मध्ये पीडब्ल्यूडीने बांधलेल्या दोन मोठ्या ओव्हरहेड वॉटर टँकचाही त्यांनी यावेळी उल्लेख केला. वार्का येथे १००० घनमीटर टँक आणि ओरली येथे ५०० घनमीटर टँक – जे पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे वापरात नाहीत. कार्मोना येथे ३०० घनमीटर सुविधेसह टाक्या या भागातील पाण्याच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी होत्या परंतु त्याऐवजी त्या आता अयशस्वी नियोजन आणि नोकरशाहीच्या अकार्यक्षमतेचे प्रतीक बनल्या आहेत असा आरोप यावेळी त्यांनी केला.

ग्रॅसियास यांनी पीडब्ल्यूडीच्या अलिकडच्या दाव्यावर टीका केली की, पंपिंग स्टेशनसाठी अतिरिक्त जमीन आवश्यक आहे, आणि सुरुवातीच्या नियोजन टप्प्यात अशा मूलभूत गरजांचा विचार का केला गेला नाही असा प्रश्न उपस्थित केला. काँग्रेस गटानेबाणावलीचे आमदार वेंझी व्हिएगस यांच्या तीन वर्षांच्या कार्यकाळात या समस्येचे निराकरण करण्यात अपयशी ठरल्याबद्दल टीका केली.

उन्हाळा जवळ येत असताना, ग्रॅसियास यांनी आमदार आणि पीडब्ल्यूडी पोर्टफोलिओ असलेल्या मुख्यमंत्र्यांनी तातडीने हस्तक्षेप करून टाक्या कार्यान्वित करण्याची किंवा कमी दाबामुळे टाक्या भरण्यापासून रोखणाऱ्या अपुऱ्या पाइपलाइन नेटवर्कच्या जागी नवीन पाईपलाईन टकाण्याची मागणी केली.

## सौरऊर्जेला चालना देण्यासाठी वीजमंत्र्यांचे आवाहन

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १५ ::** वीजमंत्री सुदिन ढवळीकर यांनी नागरिकांना सौर हरित ऊर्जेचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन करताना, मोफत वीज आणि अतिरिक्त सौरऊर्जेद्वारे उत्पन्न मिळवण्याचा लाभ स्पष्ट केला. कोळशावर आधारित वीज निर्मितीमुळे होणारे पर्यावरणीय प्रदूषण रोखण्यासाठी, तसेच कोळसा आयातीवरील खर्च कमी करण्यासाठी सौरऊर्जा हा उत्तम पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले.

बांदोडा गाव पंचायतीत आयोजित विशेष सत्रात सौर छत योजना आणि पीएम–कुसुम ब' व अ' योजनेचे सादरीकरण करताना त्यांनी नागरिकांना सौरऊर्जेच्या महत्त्वाची जाणीव करून दिली. ढवळीकर म्हणाले की, देश मोठ्या प्रमाणात कोळसा आयात करत असून, त्यावर अवलंबून राहणे भविष्यात कठीण होईल. ऑस्ट्रेलियातून आयात होणारा कोळसा महागडा आहे. जर आपण छतावरील सौर पॅनेलच्या माध्यमातून स्वतःची वीज निर्मिती केली, तर हा मोठा आर्थिक आणि पर्यावरणीय फायदा ठरेल.

या नव्या योजनेअंतर्गत नागरिकांना छतावर सौर पॅनेल बसवण्याचे आवाहन करताना ढवळीकर म्हणाले की, सौरऊर्जेचा वापर करणाऱ्यांना दरमहा ४०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळते. तसेच, ज्या नागरिकांनी अतिरिक्त वीज निर्मिती केली, ते सरकारला वीज पुरवून उत्पन्नही मिळवू शकतात. महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील वीज दरांच्या तुलनेत गोव्यातील दर कमी असल्याचे नमूद करताना त्यांनी स्पष्ट केले की, देखभाल खर्च कमी असल्याने सौर छत योजना फायदेशीर ठरेल. पंतप्रधानांनी सुरू केलेल्या या योजनेत गोवा सरकार ५० टक्के अनुदान देत असल्याचे ढवळीकर यांनी सांगितले. या योजनेचा लाभ घेण्यासाठी टेरेस असलेले घर आवश्यक असून, ४०० युनिट किंवा त्यापेक्षा कमी वीज वापरणाऱ्या ग्राहकांना ५ किलोवॅट क्षमतेच्या सौर पॅनेल बसवण्यासाठी अनुदान मिळेल.

त्यांनी शेतकऱ्यांसाठी असलेल्या योजनांबद्दलही माहिती दिली. नापीक किंवा पडिक जमिनीत सौरऊर्जा प्रकल्प उभारता येतात, आणि अतिरिक्त वीज निर्मिती केल्यास सरकार ती प्रति युनिट ३.७ रुपयांनी खरेदी करेल असे सांगितले. स्थानिकांनी सौरऊर्जा प्रकल्पांच्या खर्च आणि देखभालीबाबत विविध शंका उपस्थित केल्या, ज्याचे समाधान जीईडीए अधिकाऱ्यांनी केले. काही नागरिकांनी आपल्या यशस्वी अनुभवांची माहिती दिली. दिनेश नाईक यांनी सांगितले की, त्यांच्या सौरऊर्जा प्रकल्पाचा खर्च वसूल झाला असून आता त्यांना वीज बिल लागत नाही. तसेच, सरकारला पुरवलेल्या वीजेसाठी जीईडीएकडून त्यांना दरमहा १२,००० रुपये मिळतात. प्रत्येक गावाने सौरऊर्जेचा अवलंब करून स्वतःचे हरित ऊर्जा गाव' बनवावे,असे आवाहन करताना वीजमंत्र्यांनी सौरऊर्जा ही भविष्यातील ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वोत्तम उपाय असल्याचे अधोरेखित केले.

## गोवा माईल्सचा टॅक्सी व्यावसायिकांना फटका

▶ संतापयुक्त व्यावसायिकांकडून कारवाईची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १५ :** गोवा सरकारने गोवा माईल्स टॅक्सी व्यवसायिकांना झुकते माप देऊन स्थनिक टॅक्सी व्यावसायिकांची गळचेपी चालविली असून, पर्यटन हंगामात वारंवार होणाऱ्या ह्या घटनांमुळे पर्यटन स्थळांचे नाव बदनाम होत असल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, टॅक्सी परवाने असलेल्या स्थानिक व्यावसायिकांनी फक्त पाहत व टॅक्सी घेऊन तिष्ठत राहावे.चरितार्थ चालवण्यासाठी भाडी मारावी लागतात. मात्र, पर्यटकाकडे मुजोरगिरी गोवा माइल्सचे कर्मचारी करीत आहेत,मात्र सरकार व वाहतूक खाते स्थानिक व्यवसायिकांच्या नावे खडे फोडीत बसतो,असे मत काहींनी व्यक्त केले.

काल १४ रोजी रात्री ८ च्या सुमारास स्विफ्ट कार चालक हरमल किनारी भागात पर्यटकांना घेऊन आला होता. ते उतरताच, अन्य पाच विदेशी पर्यटक टॅक्सीत येऊन बसल्याने स्थानिक पर्यटक टॅक्सी व्यावसायिकांनी हरकत घेतली व टॅक्सी ड्रायव्हरास विचारणा केली.त्यावेळी त्या स्थानिक टॅक्सी चालकाने पोलिस नंबर वर संभाषण केले. त्यावेळी स्थानिकांनी पोलीस येइस्तो वाट पाहिली मात्र पोलीस न फिरकल्याने स्थानिकांनी टॅक्सी मांद्रे पोलीस स्थानकात नेण्यास भाग पाडले,असे समजते. दरम्यान,गोवा माईल्स टॅक्सी भाडे घेऊन आल्यानंतर पुन्हा त्याच टॅक्सीने दुसरे भाडे कसे काय नेऊ शकतो हा प्रश्न आहे.पर्यटकाना उतरवल्यानंतर सदर टॅक्सी,दोन किलोमीटर अंतरा बाहेर थांबू शकतो,असे नियम असताना,सदर टॅक्सी त्याठिकाणी थांबून पर्यटकांना नेतो व चक्क पोलिसाना फोन करण्याचे नाटक करतो,ह्यावरून स्थानिकात संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, पर्यटन हंगामात स्थानिक टॅक्सी व्यावसायिकांनी नेहमीच संयम बाळगला व शांततापूर्ण मार्गाने आवाज उठविला.

